Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 676 – 679

DOI: 10.5281/zenodo.10279172

Original Research Article

# महात्मा गांधी यांचे ग्रामविकास विषयक विचार : एक अभ्यास

प्रा. डॉ. दामावले डी. एन.

प्र. प्राचार्य व समाजशास्त्र विभागप्रमुख पंडित दीनदयाल उपाध्याय महाविद्यालय, देवणी जि. लातूर ४१३५१९ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: damawaled1976@gmail.com

Received: 12 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

**प्रस्तावना**

महात्मा गांधीजी कर्ते सुधारक होते. त्यांनी जगाला सत्य व अहिंसेचा मार्ग दाखविला. भारताची जडणघडण करण्यात त्यांचे योगदान महत्त्वाचे राहिलेले आहे. त्यामुळेच त्यांना आदराने राष्ट्रपिता संबोधले जाते. भारत हा खेड्यांचा देश आहे असे भारतभ्रमण केल्यानंतर गांधीजींचे मत झाले होते. त्यामुळे खेडयांचा विकास झाल्याशिवाय भारताचा विकास होणार नाही हे त्यांनी ओळखले. महात्मा गांधीजींनी मांडलेल्या ग्राम स्वराज्याच्या किंवा ग्रामराज्याच्या तत्वज्ञानामध्ये खेड्यांच्या सर्वांगीण विकासाला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. देशातील प्रत्येक गाव स्वावलंबी व स्वयंपूर्ण व शांतताप्रिय झाले तर बाहेरील मदतीची त्याला काहीच आवश्यकता वाटणार नाही. महात्मा गांधीजीच्या विचारांमध्ये ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेला महत्वाचे स्थान आहे. गांधीजीच्या असा विश्वास होता की, राज्यसत्ता, अर्थसत्ता व समानसत्ता यांचे प्रत्येक गावात एकमत झाले तर ग्रामराज्यच नव्हे तर रामराज्य देखील निर्माण होवू शकेल. महात्मा गांधीजींच्या मते, खरा भारत गावांमध्ये आहे. गावामध्ये जोपर्यंत शहरासारख्या सुविधा विकसित केल्या जाणार नाहीत तोपर्यंत समग्र भारताचा विकास होणार नाही. ग्रामीण भाग हा केवळ राजकीय सत्तेचे केंद्र न बनता अर्थकारणाचे व समाजकारणाचे देखील केंद्र बनले पाहिजे यावर गांधीजी ठाम होते. गांधीजीच्या ग्रामराज्याच्या तत्वज्ञानात ग्रामीण विकासाची कल्पना समाविष्ट झालेली आहे. अर्थात स्थलकाल परिस्थितीनुसार ग्रामीण विकासाची संकल्पना सतत विस्तारत जात असल्यामुळे तिचा अनेक दृष्टीकोनातून अभ्यास करणे महत्वाचे ठरते.

ग्रामीण भागातील परिस्थितीत सुधारणा व्हावी, त्यांचा विकास व्हावा, खेडयातील जीवनदेखील सुखकर व्हावे याकरिता म. गांधींनी स्वत: बऱ्याच योजना आखल्या होत्या. म. गांधीजींच्या मते, केवळ शहरांचा किंवा नगरांचा

विकास म्हणजे भारत देशाचा विकास नव्हे तर जोपर्यंत भारतातील खेड्यांचा किंवा ग्रामीण भागाचा विकास होत नाही तोपर्यंत भारताचा आर्थिक विकास होणार नाही. ग्रामीण भागात शेती व्यवसाय नव्हे तर अनेक पारंपारिक लहान उद्योग व्यवसाय देखील संकटात आले आहेत तर काही काळाच्या ओघात संपले आहेत. ग्रामीण भागातील विविध समस्या यासाठी कारणीभूत आहेत. म.गांधी यांचे ग्रामविकास विषयक विचार अभ्यासणे त्यामुळेच महत्त्वाचे ठरते.

**उद्दिष्ट्य**

त्यांच्या ग्रामविकास विषयक विचारांचा अभ्यास करणे हे प्रमुख उद्दिष्ट्य समोर ठेवून प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यात आला आहे.

**गृहितके**

१. म.गांधींचे ग्रामविकास विषयक विचार आजही प्रासंगिक आहेत.

२. ग्रामविकासामुळेच भारताची प्रगती शक्य झालेली आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम साधन सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने संदर्भ ग्रंथे, मासिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट इत्यादींचा आधार घेण्यात आला आहे. या शोधनिबंधाच्या मांडणीसाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**महात्मा गांधींचे ग्रामविकास विषयक विचार**

आज जगभर गांधीजींच्या विचारांना मान्यता मिळालेली दिसून येते. त्यात त्यांनी मांडलेले ग्रामविकास विषयक विचार आणि केलेले कार्यही अनन्यसाधारण आहे. म.गांधी यांनी ग्रामविकासाच्या संदर्भात विश्वस्त, स्वदेशी, श्रम प्रतिष्ठा, ग्रामोद्योग, ग्रामस्वराज्य, सत्तेचे विकेंद्रीकरण, सार्वजनिक स्वच्छता, महिला सबलीकरण, आरोग्य, शिक्षण, औद्योगिकीकरणाला विरोध, खादी, कृषि, पर्यावरण यांना महत्त्व असलेले दिसून येते. तर ग्रामीण समाजात निरक्षरता नाहीशी करणे, अंधश्रद्धा निर्मूलन, ग्रामीण समाजात आढळणारी व्यसनाधिनता दूर करण्यासाठी, लिंगभेद प्रवृत्ती, अस्पृश्यता निर्मूलन यासाठी म.गांधीनी खूप प्रयत्न केलेले दिसून येतात.

**१. स्वावलंबन**

जर प्रत्येक गाव स्वावलंबी बनले तर गावाबरोबर भारतही स्वावलंबी बनेल. त्यामुळे गावाबरोबर प्रत्येकाने स्वावलंबी बनावे असा गांधीचा आग्रह होता. मूलभूत गरजांसाठी इतरांवर अवलंबून न राहता स्वकष्टाने त्या पूर्ण कराव्यात असे ते म्हणत. स्वावलंबनासाठी त्यांनी स्वच्छता, शाकाहार, सत्य, अहिंसा या तत्त्वांना स्वत:च्या जीवनात वापरून आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या विचारातून आत्मनिर्भर भारत ही संकल्पना उदयास आली. त्यांचे स्वावलंबन हे व्यापक अर्थाने होते. यात कृषि, समाज, शेतकरी, लघूउद्योग अशा सर्वच घटकांचा समन्वय साधलेला दिसून येतो.

रामराज्य, ग्रामस्वराज्य, सर्वोदय या संकल्पनेमध्ये स्वयंपूर्णता अभिप्रेत होती. स्वावलंबनामुळे ग्रामीण भागातून शहरी भागात होणारे स्थलांतर थांबेल असे त्यांना वाटत होते. म. गांधीजीनी जनतेला व कार्यकर्त्यांना खादी वापरण्याचा सल्ला दिला. बंद पडलेले हातमाग परत चालू होतील व तसेच स्वाभीमान व स्वदेशी अभिमान जागृत होईल. स्वावलंबनाला व स्वदेशीला चालना मिळविण्यासाठी सुत कताईचे आवाहन गांधीजीने केले.

### २. लघूउद्योग

ग्रामीण समाज हा पारंपारिक समाज असून त्याचा मुख्य व्यवसाय शेती, शेतीशी संबंधीत उद्योगधंदे आहे. त्यामुळे त्यांचा विकास होणे गरजेचे आहे. त्यामुळे म.गांधीनी जमीनदारी प्रथेला विरोध केलेला होता. जमिनीची मालकी व्यक्तिगत स्वरूपात न राहता समाजाची राहिली पाहिजे असे त्यांचे मत होते. संतुलित व योजनाबद्ध पद्धतीचा अवलंब, शेतकऱ्यांना सावकारी व महाजनांच्या शोषणापासून मुक्तता, आवश्यक खाद्यान्नाचे उत्पादन अशा प्रकारच्या सूचना शेती सुधारणेबाबत त्यांनी दिल्या. तसेच कुटीरोद्योगांनाही त्यांनी प्रोत्साहन दिल्याचे दिसून येते. लघूउद्योगामुळे स्थानिक पातळीवर रोजगार निर्मिती होते त्यामुळे मोठमोठे उद्योगधंदे व लघू उद्योगात स्पर्धा असू नये तर ते परस्परपूरक असले पाहिजेत. गावपातळीवर लघूउद्योग विकसित झाल्यास त्यांना शहरावर अवलंबून राहण्याची गरज नाही असे ते म्हणत.

### ३. श्रमप्रतिष्ठा

प्रत्येकाने श्रममय जीवन जगले पाहिजे, शारीरिक श्रम हे प्रत्येकाचे मानवाचे कर्तव्य आहे असे ते म्हणत. श्रमामुळे मानवाला प्रतिष्ठा प्राप्त होते. प्रत्येकाने श्रम करणे गरजेचे आहे. सर्वांच्या श्रमाचे मूल्य समान असावे. तसेच सामूहिक श्रमाने गावाची स्वच्छता, सामूहिक शेती यामुळे गावही समृद्ध होते. अवाढव्य यंत्रे मानवी श्रमाला दुय्यम करतील म्हणून त्यांनी त्यास विरोध करुन श्रमाला अधिक महत्त्व दिलेले दिसून येते. बौध्दिक श्रमाप्रमाणे शरीर श्रमाला महत्त्व प्राप्त झाले पाहिजे. श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त होण्यासाठी शारीरिक श्रमाला मिळणाऱ्या मोबदल्यात वाढ झाली पाहिजे. तरच श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त होईल. केवळ शाब्दिक सहानुभूतीने श्रमिकांचे जीवनमान सुधारणार नाही तर बौध्दिक कार्याप्रमाणे शारीरिक कष्ट करणाऱ्या लोकांना चांगले वेतन मिळाले पाहिजे.

### ४. विकेंद्रीकरण

म.गांधी सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याच्या उद्देशाने त्यांनी अपरिग्रहाचा आणि विश्वस्तांच्या कल्पनेचा विचार मांडला होता. महात्मा गांधी यांच्या मते अर्थव्यवस्था ही केंद्रीत होता कामा नये. केंद्रीत व्यवस्था ही हिंसेला जन्म देते. ते सत्य, अहिंसेच्या मार्गाने विकास साधण्यावर भरत देत असत. त्यामुळे ग्रामपातळीवर झालेले उत्पादन आणि वितरण प्रणालीचे विकेंद्रीकरण होणे त्यांना गरजेचे वाटत होते. ज्यामुळे आर्थिक विषमता निर्माण होणार नाही. ग्रामांच्या विकासासाठी ग्रामपातळीवर पंचायतीला अधिकार असावेत. श्रेष्ठ कनिष्ठ असा भेद नसावा. उद्योगांचे विकेंद्रीकरण असावे. अस्पृश्यता निवारण, अंधश्रद्धा निर्मूलन, दारिद्र्य निवारण, दारुबंदी, प्रौढ शिक्षण, सहकार, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन यातून आदर्श

ग्रामाचे निर्माण होईल. महात्मा गांधीजी म्हणतात की, विकासाची प्रक्रिया गावांकडून तालुका-जिल्हयाकडे जाणारी असावी.

**५. लोकसहभाग**

ग्रामविकास साध्य करण्यासाठी जनतेचा निर्णय प्रक्रियेतील सहभाग वाढविण्याबाबत गांधी आग्रही होते. ग्रामपातळीवरचे लोकप्रतिनिधी तालुक्याचा कारभार चालविणाऱ्यांना निवडून देतील, ते जिल्ह्याचा कारभार चालविणाऱ्यांना आणि जिल्हा प्रतिनिधी राज्य व राज्याचे प्रतिनिधी देशाचा कारभार चालविणाऱ्यांना निवडून देतील. त्यामुळे सत्तेचे विकेंद्रीकरण होईल असे त्यांचे मत होते. ग्रामांच्या विकासासाठी जाती-धर्मातील भेद नष्ट होऊन त्यांच्यात सौहार्दाचे वातावरण निर्माण व्हावे. विधायक कामे सामूहिक प्रयत्नातून करण्यात यावीत. सर्वधर्मसमभाव, शिस्त, नैतिक आचरण, चारित्र्यसंपन्नता, नेतृत्व, सहकार्य वृत्ती या मूल्यांमुळे आदर्श नागरिकाची निर्मिती होत असते त्यामुळे गांधींनी या मूल्यांवर भर दिलेला दिसून येतो.

एकंदरीत गांधींनी ग्रामाच्या संरचनेचा सखोलपणे अभ्यास, निरीक्षण केलेले होते. त्यामुळे त्यांनी ग्रामाच्या विकासावर भर दिलेला दिसून येतो. केवळ विचार न मांडता त्यांनी ग्रामविषयक साधण्यासाठी सक्रिय कार्यही केलेले दिसून येते.

**निष्कर्ष**

गांधीजींच्या ग्रामविकासाचा केंद्रबिंदू खेडे असलेले दिसून येते. ग्रामीण भागाचा विकास झाल्याशिवाय देशाचा विकास झाला, असे म्हणता येणार नाही. म्हणून शासनकर्त्यांनी आणि नियोजनकर्त्यांनी ग्रामीण भागाच्या विकासाकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. सक्षम स्थानिक स्वराज्य संस्था आणि स्वयंपूर्ण खेडी यांचे महत्त्वही यावरुन अधारेखित होते. ग्रामामध्ये शहरी भागाप्रमाणे संसाधनाची उपलब्धता करून दिली गेली पाहिजे. ग्रामांच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष आणि भरघोस आर्थिक तरतूद करण्यात यावी. पारंपरिक उद्योगांना प्रोत्साहन दिल्यास शाश्वत विकास साध्य करणे शक्य होईल. यासंदर्भात म.गांधीजींनी मांडलेले विचार, केलेल्या कृती दिशादर्शकच नसून आत्मनिर्भर भारतासाठी अनिवार्य आहेत.

**संदर्भ सूची**

१. प्रा.दिगंबर डी.बिरादार-पाश्चिमात्य आणि भारतीय राजकीय विचारवंत

२. प्रा.भा.कि. खडसे-समाजशास्त्र, हिमालया बुक्स प्रा.लि. मुंबई

३. डॉ.प्रदिप आगलावे-भारतीय समाज:संरचना आणि समस्या, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

४. योजना, साधना मासिके

५. https://social-work.in/gramin-vikas